# प्रकाशनानिमित्त रंगली 'कॉफी पे चर्चा'

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

क्रिकेटपासून ते राजकारणापर्यंत आणि साहित्यापासून ते सिनेमापर्यंत विविध क्षेत्रांतल्या घटना-घडामोडींवर मार्मिक शब्दांत तिरकस भाष्य करणाऱ्या गप्पांची मैफल रविवारी सकाळी रंगली अन् त्यातून उलगडत गेला 'कॉफीशॉप' निर्मितीचा प्रवास!

निमित्त होते, महाराष्ट्र टाइम्सचे असिस्टंट न्यूज एडिटर श्रीपाद ब्रह्मे यांच्या 'कॉफीशॉप' या ललित लेखसंग्रहाच्या प्रकाशनाचे. कॉफीशॉपच्या पुस्तकासाठी खास त्याच पद्धतीचा बॅकड्रॉप आणि पुस्तक प्रकाशनाच्या पारंपरिक कार्यक्रमाऐवजी प्रमुख पाहुण्यांच्या साथीने रंगलेली 'कॉफी पे चर्चा' अशा स्वरूपात हा कार्यक्रम झाला. प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि ज्येष्ठ वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत या गप्पांच्या मैफलीत हास्याचे फवारे आणि विनोदाची कारंजी उडत राहिली. कॉन्टिनेन्टल प्रकाशनातर्फे हे पुस्तक, तर बुकगंगातर्फे इ-बुक प्रकाशित करण्यात आले. कॉन्टिनेन्टल प्रकाशनाच्या देवयानी अभ्यंकर आणि बुकगंगाचे मंदार जोगळेकर या वेळी उपस्थित होते.

स्वप्नील शिंदे




**कॉफीशॉप पुस्तक प्रकाशन कार्यक्रमानंतर गप्पांच्या मैफलीत संवाद साधताना रामदास फुटाणे आणि सोनाली कुलकर्णी.**

'जामखेडसारख्या भागात लोकमान्य वाचनालयामुळे वाचनाचे संस्कार आमच्यावर घडले. त्यामुळे पुण्या-मुंबईत आल्यानंतर अधिक सकस, दर्जेदार वाचनाची गोडी लागली. त्यातून विचार करण्याची आणि ते लेखनाद्वारे वाचकांपर्यंत पोहोचविण्याची अभिरूची निर्माण झाली. रोजच्या जगण्यातील विसंगती टिपून त्यावर भाष्य करण्याची आणि वाचकांना आनंद देण्याची कला खूप मोजक्या व्यक्तींना जमते. त्यात श्रीपादने हक्काने स्थान पटकाविले असून, पुणे ३० ची पसंती मिळवली आहे,' अशा शब्दांत फुटाणे यांनी ब्रह्मे यांच्या लेखनाचे कौतुक केले.

'डेडलाइनमध्ये सदर लेखन करणे, ही अतिशय अवघड गोष्ट असल्याचा स्वानुभव कथन करतानाच, सर्व लेखांतून एका नव्या पिढीच्या संवेदनशीलतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असले, तरी आम्हाला जबाबदारीची योग्य जाणीव आहे. विविध माध्यमांचा वापर करून व्यक्त होण्याची तीव्र इच्छा आमच्यामध्ये दडलेली आहे,' असे सोनालीने सांगितले; तसेच साहित्य जतन करण्याची सोय आपल्याकडे नाही, त्याला चालना देण्याची गरजही तिने व्यक्त केली.

प्रसिद्ध कलावंत जसपाल भट्टी यांचे 'उलटा-पुलटा'चे हिंदी लेख मराठीत भाषांतरित करताना, तिरकस विनोद लेखनातील मर्म समजले. त्यानंतर २००७ च्या विश्वचषकादरम्यान पुन्हा तसा प्रयोग केला आणि मग सलग साडेतीन वर्षे कॉफीशॉपच्या निमित्ताने विविध विषयांवर विनोदी शैलीतून भाष्य करण्याची संधी मिळाली, अशा शब्दांत ब्रह्मे यांनी मनोगत व्यक्त केले. सिद्धार्थ केळकर यांनी या सर्वांशी दिलखुलास संवाद साधला.